
ISSN 2231-0096 Volume - 10 Number - 2 Feb. 2020

# Platinum

**A Peer Reviewed National Journal**




अथर्व

Scanned with CamScanner

ISSN 2231-0096

# Platinum

A Peer Reviewed
National Multidisciplinary Journal

Volume - 10 Number - 2 Feb. 2020

**Editor**
Dr. Madhukar. V. Patil, Nandurbar

**Asst.Editor**
Dr. Shubhangi D. Rathi
Dr. H.R.Chaudhari
Prin. Dr. Vinod V. Patil
Dr. S.J. Patil

**Advisory Editors**
Dr. Shyam Kayande, Nagpur
Dr. Shivankar S.N., Karnataka
Dr. Kishor Gaikwad, Mumbai
Prin. Dr. A.P.Khairnar,Nizampur
Dr. Prashant Puranik, Ujjain (M.P.)
Dr. Naresh J. Parikh, Gujrat
Dr. Keshav Phale, Amravati
Dr. A. M. Garode, Chikhli

**Managing Editor**
Mr. Yuvraj Mali

**Editorial Office**
**Atharva Publications**
Plot No.17, Devidas Colony
Varkhedi Road, Dhule - 424 001
**www.atharvapublications.com**
**E-Mail :** atharvapublications@gmail.com

**Branch :**
**Circulation & Advertisement**
**Atharva Publications**
Basement, Om Hospital, Near Anglo Urdu
Highschool, Dhake Colony, Jalgaon - 425001
Ph.No. 0257-2239666

**Subscription Rates**
Single Copy for reader Rs. 350.00 or
US $ 35.00 Only (extra postage charge)
For printing/ Publication of research Paper
Individuals Rs. 1200.00 (each research paper) Or
US $ 100.00
Institutions Rs. 1400.00 per annum Or Us $ 140.00

1. Editing of the research journal is processed without any remittance. The Selection and publication is done after recommendation of subject expert Refree.
2. Thoughts, Language vision and example in published research paper are entirely of author of research paper. It is necessary that both editor and editorial board are satisfied by the research paper. The responsibility of the matter of research paper is entirely of author.
3. Along with research paper it is compulsory to sent Memership form and copyright form.
4. In any condition if any National/ International university denies to accept the research paper published in the journal then it is not the responsibility of Editor, Managing Editor Publisher and Management.
5. Before re-use of published research paper in any manner, it is compulsory to take written acceptance form Managing Editor unless it will be assumed as disobedience of copyright rules.
6. All the legal undertaking related to this research journal are subjected to be hearable at Dhule Jurisdiction only.
7. The research journal will be sent by normal post. If the journal is not received by the author of research paper then it will not the responsibility of Editor and publisher. The amount or registered post should be given by the author of research paper. It will be not possible to sent second copy of research Journal.
8. Authors are requested to follow the author's Guide lines Contect Managing Editor - 9764694797

- For book reviews, please send two copies of the book (one for the Reviewer and other for the library of the journal) to the Managing editor.
- Donations of books /journals / cash / gift are welcome and will be gratefully acknowledged. All disputes concerning the journal will be settled in the court of Jalgaon, Maharashtra.

**प्लॅटिनम या त्रैमासिकात प्रसिद्ध झालेली मते संपादक, सहसंपादक, कार्यकारी संपादक, आणि सल्लागार मंडळ यांना मान्य असतीलच असे नाही. या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखातील लेखकांची मते ही त्यांची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोधनिबंधाची जबाबदारी ज्या-त्या लेखकांवर राहिल.**

मेसर्स अथर्व पब्लिकेशन्स्च्यावतीने कार्यकारी संपादक श्री.युवराज माळी यांनी प्लॉट नं.१७, देविदास कॉलनी, धुळे-४२४ ००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले व झरोका प्रिंटर्स, जळगाव येथे मुद्रित केले. मोबाईल : ९४०५२०६२३०. जळगाव (ऑ.) : ०२५७-२२३९६६६.

Scanned with CamScanner

- **Role of Dr. Anandibai Joshi for Woman Helth** ........ 45
  *Dr. Swati D. Sonawane*
- **Role of Womens in Indian Army Services** ........ 46
  *Mr. Dipakrao B. Deore*
- **Contribution of Women in Freedom Movement** ........ 47
  *Dr.Vidhya Bhaisare*
- **Constitutional and Legal Rights of Women in India** ........ 49
  *Prof. Dr. Farida Shafik Khan*
- **Women Empowerment in Indian Scenario !!** ........ 53
  *Dr. R Sudam*
- **A study of Women Empowerment in Maharashtra Evidences from NFHS 4** ........ 55
  *Uttam J. Sonkamble*
- **Women Leadership and Politics** ........ 57
  *Dr. Mohini Upasani*
- **Contribution of Women Writers in the Development of Indian English Literature: An Overview** ........ 58
  *Mrs. Anjali K. Patil*
- **Emerging women leadership in India** ........ 62
  *Dr. Anant V. Deshmukh*
- **Women Development and Indian Constitutional Provisions** ........ 64
  *Dr. Maroti Nivarati Gaikwad*
- सामाजिक दृष्टीकोणातुन स्त्रियांची आरोग्य विषयक स्थिती ........ ६७
  *प्रा.अनिता एम.खेडकर*
- राष्ट्रीय विकासात महिलांचे योगदान ........ ६९
  *प्रा. आशिष सुभाषलाल गुजराथी*
- स्वातंत्रोत्तर भारतीय राजकारणातील प्रभावशाली महिलांचे अध्ययन ........ ७२
  *प्रा. राजेंद्रसिंह वा. दिक्षीत*
- महिला नेतृत्व आणि राजकारण ........ ७५
  *प्रा. भगवानसिंग देवेसिंग गिरासे*
- बचत गटामुळे ग्रामिण भागातील महिलांच्या विकासात झालेला बदल ........ ७८
  *डॉं. लोकेश बी. नंदेश्वर*
- स्वंय सहाय्यता बचतगटातील महिलांचा व्यवस्थापन नियोजनातील सहभाग ........ ८२
  *कु. भारती टेंभूरकर*
- झिम पोरी झिम या कादंबरीतील जनाचा शिक्षणासाठीचा संघर्ष ........ ८४
  *डॉ. किशोर आर. पाठक*
- भारतीय महिला उद्योजकांसमोरील प्रमुख आव्हाने ........ ८६
  *प्रा.डॉ. संजय पी पाटील*
- महिला सक्षमिकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाची भुमिका ........ ८९
  *प्रा. डॉ.प्रशांत एन. शंभरकर*



Scanned with CamScanner

# सामाजिक दृष्टीकोणातुन स्त्रियांची आरोग्य विषयक स्थिती

प्रा. अनिता एम. खेडकर
पं.ज.ने. समाजकार्य महाविद्यालय, आकोट

**प्रस्तावना :**

आरोग्य हा मुलभुत मानवी अधिकार मानला आहे. आरोग्य विविध बाबींशी निगडीत आहे, स्त्री-पुरुष भेदभाव ही त्यातील एक महत्वाची बाब आहे. जागतिक आरोग्य संघटना व युनिसेफ या संघटनांनी जगातील समस्या नागरीकांना आरोग्य हा मुलभत मानवी अधिकार असे दिलले अभिवचन आहे. संयुक्त राष्ट्रसंघाशी संबंधित या दोन्ही संघटनांनी १९७८ साली अल्मा आटा येथे भरलेल्या जागतिक परिषदेत सर्वांसाठी आरोग्याची घोषणा केली. भारत सरकारने देशातील सर्व नागरीकांना आरोग्यमय जीवन जगता येईल अशी जाहीर हमी दिली आहे. परंतु आजार ही व्यक्तीसापेक्षा बाब आहे. एखाद्याचा जो आजार किरकोळ वाटेल तो दुसऱ्याला गंभीर वाटु शकेल. अनारोग्याची आपली व्याख्या वय, लिंग, व्यवसाय, सामाजिक दर्जा या साऱ्या बाबींशी निगडीत असते, म्हणूनच आरोग्य हा एक व्यापक सामाजिक प्रश्न आहे. तिसऱ्या जगातील भारतासारख्या देशात प्रत्येक वर्षी लाखो बालके मृत्यूमुखी पडतात, प्रदुषित पाणी व अन्नातुन अतिसारासारख्या रोगाचा प्रादुर्भाव होतो. आपल्या देशात बहुसंख्य लोक खेडेगावात किंवा शहरातील चाळीत, झोपडपट्टीत राहतात. तेथे पिण्याचे स्वच्छ पाणी व सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था अभावानेच दिसते. उन्हाळ्यात गावातील विहीर आटतात. भांडभर पाण्यासाठी स्त्रियांना मैलोनमैल चालावे लागते, पण ते पाणीही दूषित असते. पाणी उकळुन निर्जंतुक करण्यासाठी इंधन मिळणेही दुरापास्त असते. शहरात पाण्याचा सरमिसळ होतो. इत्यादी अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे अनेक आरोग्य विषयक समस्या देखील उद्भवतात शाळा महाविद्यालये यातुन समस्या नियंत्रणाविषयी उपाय योजना करणे गरजेचे आहे. चर्चा, मेळावे, परिषदा, परिसंवाद आयोगाद्वारे जनमत तयार करणे गरजेचे असते. तसेच प्रसार माध्यमांद्वारे मतपरिवर्तन करणे आवश्यक ठरते.

**उद्देश -**

१ स्त्रीयांचे आरोग्य विषयक सामाजिक दृष्टीकोण आभ्यासणे.

२ स्त्रीयांची आरोग्य विषयक स्थिति आभ्यासणे.

**आरोग्य विषयक प्रश्न -**

भारतातील सर्वच व्यक्तींना आरोग्यसंपन्न जीवन जगता यावे म्हणून शासनाकडुन प्रयत्न केले जातात. देशात शासनाच्या आरोग्य खात्याच्या मार्फत देशातील पर्यायाने समाजातील व्यक्तींच्या आरोग्याची एकीकडे काळजी घेतांना दुसरीकडे तिच्या एकूण आरोग्याची जपवणूकही केली जाते. शारीरिक आरोग्याचा विचार करताना आणखी एका गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. मानवी शरीराचे, शारीरिक दृष्टीने विचार करता, स्त्रियांचे शरीर व पुरषांचे शरीर असे दोन भाग पडतात. व्यक्ती वयात येण्याची प्रक्रिया चालू असतांना तिच्या शरीरानुरूप त्या त्या व्यक्तीत स्त्रीत्वाचे वा पुरूषत्वाचे गुणधर्म विकसित होतात पुरूष शरीराशी निगडीत आरोग्यविषयक समस्यात त्यांची मद्याधीनता, व्यसनाधीनता त्यांची प्रकृती बिघडविण्यास कारणीभूत ठरते. स्त्री व पुरूष शरीराशी निगडीत आरोग्याचे प्रश्न वेगवेगळे असतात. आरोग्यविषयक बाबीं शिवाय स्त्री शरीराला काही गोष्टींचा सामना करावा लागतो. स्त्री वयात येते म्हणजे मासिक पाळीला सुरूवात होणे होय. मासिक पाळीच्या काळात आवश्यकतेपेक्षा जास्त वा कमी रक्तस्राव होणे, ओटीपोटात दुखणे, मासिक पाळी नियमित नसणे इत्यादी आरोग्यविषयक प्रश्नांचा सामना स्त्री शरीराला करावा लागतो. स्त्री शरीराशी निगडीत दुसरा आरोग्यविषयक प्रश्न म्हणजे स्त्रीला सामना करावी लागणारी बाळंतपणाची समस्या, यात गर्भाशयातील दोष, अंडबीज वाहक नलिका यातील दोष, गर्भावस्थेत हाणारे स्त्रीचे कुपोषण, गर्भाषयातील दोषांमुळे वारंवार होणारा गर्भपात. बाळंतपणानंतर काही स्त्रियांमध्ये येणारा अकाली लठ्ठपणा इत्यादी प्रश्न यात येतात. या विकसनशील आणि अविकसित राष्ट्रात अशा आरोग्य सेवा अत्यंत अल्प दरात व मोफत पुरविणे जरूरी आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानात जननी सुरक्षा योजना अतिशय महत्वाची भुमिका बजावत आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, ग्रामीण आरोग्यसेवा, जननी माता सुरक्षा योजने अंतर्गत आरोग्य सेवा योजना अवलंबिली त्यात मुले, गरोदर स्त्रिया वैद्यकिय सेवा पुरविणे या धोरणेचा वापर केला होता. योजनेचे वेगळेपण हे की आरोग्य सुधारण्यासाठी त्या त्या गावात राहणाऱ्यांना काही आरोग्य व्यवस्था संस्थांतर्फे शास्त्रोक्त प्रशिक्षण देऊन त्यांच्या मार्फत त्या त्या गावात प्राथमिक आरोग्य सेवा देण्याचे निश्चित केले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही या सेवेचा लाभ घेता येईल. ही आरोग्य व्यवस्था आरोग्यदृष्ट्या कमकुवत मुले व गरोदर स्त्रियाना जास्त प्रमाणात उपलब्ध असेल या मुळे आरोग्यपूर्ण वातावरण निर्माण होईल.

**स्त्रियाची कुटुंबातील आरोग्य स्थिती -**

गर्भलिंग परिक्षा व स्त्रीगर्भहत्या या बाबी स्त्रिच्या तसेच समाजाच्याही आरोग्याला घातक आहेत. भारतात या टेस्टचा उपयोग करून घेणारी बहुतेक मंडळी प्रशिक्षीत नसतात व आवश्यक ती साधने नसतात, त्यामुळे त्या तंत्राचा वापर अधिकच धोकादायक ठरतो. स्त्रियांच्या प्रसुती काळात स्त्री व गर्भ दोघांच्याही आरोग्याला प्रसंगी प्राणालाही धोका संभवतो. रोगजंतुचा प्रादुर्भाव, रक्तक्षय, अशक्तपणा व मानसिक तणावांचा स्त्रीच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. गर्भलिंगपरिक्षेमुळे तत्काळ गर्भपात, गर्भाच्या शरिराला इजा इ. धोके संभवतात. मुलगा-मुलगी भेद केल्यामुळे बहुसंख्य घरातील मुलींच्या



Scanned with CamScanner

आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. मुलींच्या जन्माचे स्वागत नसतेच, त्यामुळे तिच्या वाटयाला आईचे दूधही कमी काळ येत. भुक लागल्यानंतरही मुलीच्या पानात शिळे, घरातील पुरुष माणसांना न आवडलेले उरलेले असेच अन्न येते. मुलीच्या जातीने जेवायचेही सर्वांच्या शेवटी व तेही जरा हात आखडुनच असंच वळण घराघरातुन लावले जाते. पुरुष मंडळी अधिक श्रमाची कामे करतात. मुलांनाही मोठे व्हायचे असते, म्हणुन त्यांनीच भरपुर व पौष्टीक अन्न खावे अशी कारणेही त्यासाठी दिली जातात. प्रत्यक्षात मात्र पुरषांपेक्षा स्त्रियाच अधिक काळ काम करतात. अधिक जिकीरीचे कंटाळवाणे काम करतात. त्यांच्या शरिराची झीज भरुन काढण्यासाठी व भविष्यात पोटात गर्भाला वाढविण्यासाठी त्यांनाच खरी पोष्टीक, पुरेशा आहाराची गरज असते. आई आजारी पडली तर घरच्यांकडे कोण पाहणार या धास्तीने अंथरुणावर पडत नाही. अगदी नाईलाज झाला तरच तिला दवाखान्यात नेले जाते, त्यासाठी कमीत कमी पैसा खर्च होतो. मुलींच्या वाटयाला शिक्षण, फुरसतीचा वेळ, आराम, खेळ, व्यायाम हे सारे क्वचितच येते. या साऱ्या दृष्टचक्राचा अपरिहार्य परिणाम म्हणजे स्त्रियांची खुंटलेली वाढ, अशक्तपणा, रक्तक्षयाचे वाढते प्रमाण. बहुसंख्य खेड्यात व झोपडपट्टींमध्ये शौचालयाची सोय नसते. उघड्यावर मलविसर्जन केल्यास माशांद्वारे अतिसार, कॉलरा अशा रोगाची लागण वेगाने होते. उद्योगधंद्यामुळेसुध्दा मोठया प्रमाणावर जलप्रदुषण होते. भारतासारख्या गरीब देशात संध्या कृत्रिम बालआहाराचे महागडे कॅन बोकाळलेले दिसते. लहान मुलांना पोषक मातेच्या दुधाऐवजी बाटलीत दूध पाजण्याची प्रवृत्ती वाढते आहे. बाटल्या नीटपणे निरजंतुक न केल्यामुळे अतिसाराचे प्रमाण झपाट्याने वाढतांना दिसते. कधी चुकीच्या औषधोपचारामुळे अतिसाराने आजारी मुल बरे होण्याऐवजी मृत्युमुखी पडते.

मनुष्याच्या आरोग्याचे संरक्षण करण्याच्या गोष्टीला सर्वाच्च प्राधान्य दिले गेले पाहिजे. याबाबत कोणाच्या मनात कोणतीही शंका नाही. परंतु टिकाकार असा दावा करतात कि कुटुंबातील मानसांच्या आरोग्याचे रक्षण करण्याची जबाबदारी पुर्णपणे स्त्री च्या खांद्यावर पडली आहे. स्त्रिया या आरोग्य रक्षणाच्या प्रमुख शिक्षीका होत सकाळी झोपुतुन उठल्यावर आणि रात्री झोपण्यापुर्वी मुले दात घासतात की नाही, ती जास्त प्रमाणात गोड पदार्थांचे व विशेषता: चॉकलेट सारख्या दाताच्या आरोग्यास हाणीकारक ठरणाऱ्या पदार्थांचे जास्त प्रमाणात सेवन करतात का, मुलांचा आहार आरोग्य संपन्न आहे का, मुलांची तब्बेत बिघडलीतर त्यांना दवाखान्यात घेवुन जाणे इ. गोष्टींची जबाबदारी प्रामुख्याने स्त्रिची असुन आपल्या कुटुंबाच्या सर्व सभासदांना विशेषता: लहान मुलांना आरोग्य संरक्षणाचे शिक्षण देण्याचे कार्य आईच्या भुमिकेतुन स्त्रीच करते.

## स्त्रियांची समाजिक आरोग्य स्थिती

मातृत्व ही एक महत्वाची सामाजिक जबाबदारी आहे. पुढच्या पिढीला जन्म देणे मानववंश सातत्वाच्यादृष्टीने आवश्यक आहे. हे खरे पण तरीही आपले स्वतःचे मुल जन्माला न घालणाऱ्या व्यक्ती अपूर्ण असतात असे समजण्याचे काहीही कारण नाही मूल जन्माला घालू न शकणारी जोडपी समाजात नेहमीच असणार. त्यांचे समाजातील स्थान इतरां इतकेच महत्वाचे आहे. आपल्या समाजात स्त्रीचा सामाजिक दर्जा तिच्या मुलांच्या संख्येवरुन ठरविला जातो. अष्टपुत्रा सौभाग्यवती भव हा आशिर्वाद आपल्या परिचयाचा आहेच. मुलगा नसणाऱ्या स्त्रीला समाजात नेहमी अपमान, कुचेष्टा सहन करावी लागते. स्त्रीला मान मिळायला हवा तो एक व्यक्ती म्हणुन समाजाचा घटक म्हणुन यंत्र म्हणुन नव्हे. मुलगा अथवा मुलगी जन्माला येण्याचा दोष फक्त स्त्रीला हा गैरसमज दूर होतो. त्याची कारणमीमांसा अशी की, मुल न होण्याचे कारण जोडप्यांपैकी स्त्री, पुरुष वा दोघांच्या शरिरातील दोष हे असते. यासाठी केवळ स्त्रीला जबाबदार धरणे योग्य नाही. कुटुंबनियोजनाचा मुख्य उद्देश वैद्यकीय साधनांद्वारे जननदर नियंत्रीत करणे होय. सरकारी पातळीवर विस्तृत स्वरुपात या कार्यक्रमाची अंमलबजावणी केली जाते. परंतु हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वैचारीक मतपरिवर्तनाची गरज आहे. सक्तीपेक्षा स्वच्छेने लोकांना प्रवृत्त करणे अशक्य ठरते.

## सारांश

स्त्रियांना समाजात समानतेची वागणुक देणे, सर्व निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढविणे, कुटुंबनियोजनाशी संबंधित निर्णयप्रक्रियेत सर्व स्थानांवर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान असायला हवे. कुटुंबाची जबाबदारी स्त्री व पुरुष दोघांची आहे. कुटुंबात व समाजात स्त्रियांचा साधन म्हणुन उपयोग केला जाऊ नये. स्त्रियाच्या प्रसुती काळात त्यांच्या सुरक्षिततेचा विचार प्रथम केला गेला पाहिजे. स्त्रियांवरील अत्याचार रोखणे व व्यक्तिमत्व विकास करण्याची संधी स्त्रियांना मिळायला हवी. आरोग्य विषयक अडचणी कमी करण्याच्या दृष्टीकानातुन स्थानीक पातळीवर प्रयत्न करणे व जनजागृती करणे आवश्यक आहे. स्त्रियांच्या गरजांना प्राथमिक महत्व दिले गेले पाहिजे. स्त्रियांच्या अधिकाराला धक्का पोहचू नये. मुलगा मुलगी भेदभाव दुर करून स्त्री सक्षमीकरणासाठी स्त्रीवादी विचार सरणीचा पुरस्कारकरून सामाजिक जाणिव निर्माण करणे आवश्यक आहे.

## संदर्भ सूची


१) प्राची, (२००७). स्त्रिया आणि समाज पुणे: प्राची प्रकाशन
२) पी.के.कुलकर्णी, (२००८) आरोग्य व समाज, पुणे : डायमंड प्रकाशन
३) कांडेलकर लिना (२०००) मानव विकास नागपुर विद्या प्रकाशन
४) के.पार्क, (२०१५) सामाजिक आरोग्य परिचर्या, जबलपुरः बनारसीदास भनोत पब्लीशर्स.
५) वोरा देवेंद्र (१९९३) आपले आरोग्य आपल्या हातात, गाला पब्लीशर्स, अहमदाबाद.


•••



Scanned with CamScanner

BHAGINI MANDAL CHOPDA'S

# COLLEGE OF SOCIAL WORK, CHOPDA DIST. JALGAON

## Multidisciplinary One Day National Conference

on

## "Women Contribution in National Development"

*Sponsored by*

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

## Certificate

This is to certify that Mr/Mrs./Miss/Dr. ***Prof.Anita M. Khedkar***

of ***College of Social Work, Amalner*** has participated in the One Day Multidisciplinary National Conference on "Women Contribution in National Development" Sposored by Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon and organized by College of Social Work, Chopda. On Saturday 15th February 2020. He/she has presented paper entitled सामाजिक दृष्टीकोनातून स्त्रियांची आरोग्य विषयक स्थिती ............ or participated in the conference.

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. Mohini U.Upasani | Dr. Sambodhi M.Deshpande | Mr. Dnyaneshwar G.Bhagwat | Dr. Ishwar M.saundanakar |
| Co-ordinator | Co-ordinator | Co-ordinator | Principal |

Self Attested